महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:-डब्ल्यूईबी-१०२०/सीआर-२६/२०२१/मा.तं दिनांक:-०८ जून, २०२२

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:-महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२१ च्या निकालासंदर्भातील बातम्यांबाबत**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक २६ फेब्रुवारी, २०२२ रोजी घेण्यात आलेल्या विषयांकित परीक्षेमधून भरावयाच्या विविध संवर्गांचा निकाल दिनांक १ जून, २०२२ व दिनांक २ जून, २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. प्रस्तुत निकाल आयोगाकडून संगणकीय संस्करण पध्दतीने तयार करण्यात आला असून पूर्णत: अचूक आहे. निकालासंदर्भात काही वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द बातम्या या वस्तुस्थितीस धरुन नाहीत. तसेच, प्रस्तुत वृत्तपत्रांमधील बातम्यांमध्ये प्रतिक्रिया देणारे उमेदवार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरत नाहीत.

२. वृत्तपत्रांमधील बातम्यांमध्ये प्रतिक्रिया देणाऱ्या उमेदवारांपैकी समर्थ लोंढे हे उमेदवार प्राविण्यप्राप्त खेळाडू असले तरी त्यांनी अर्जात केलेल्या दाव्यानुसार ते केवळ गट-क व गट-ड संवर्गाकरीता पात्र ठरतात. विषयांकित परीक्षा गट-ब संवर्गाकरीता असल्याने ते प्राविण्यप्राप्त खेळाडूंकरीता आरक्षित पदांकरीता पात्र ठरत नाहीत. तसेच ऋषीकेश काळे या उमेदवाराने त्यांच्या उत्तरपत्रिकेतील एका प्रश्नाच्या उत्तराकरीता एकापेक्षा जास्त वर्तुळे छायांकित केली असल्यामुळे सदर प्रश्नाचे उत्तर चुकीचे ठरवून त्याप्रमाणे निकालप्रक्रियेकरीता त्यांच्या गुणांचा विचार करण्यात आला आहे.

३. कोणत्याही परीक्षेच्या निकालप्रक्रियेमध्ये अत्याधिक पारदर्शकता राखण्याच्या दृष्टीने निकालप्रक्रियेकरीता विचारात घेण्यात आलेल्या उमेदवारांच्या मूळ उत्तरपत्रिकांच्या स्कॅन प्रतिमा त्यांच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या खात्यामध्ये उपलब्ध करुन देण्याचा निर्णय आयोगाकडून घेण्यात आला आहे. त्यानुसार विषयांकित परीक्षेच्या स्कॅन उत्तरपत्रिका व निकालप्रक्रियेकरीता ग्राह्य धरण्यात आलेले गुण उपस्थित सर्व उमेदवारांच्या खात्यामध्ये मुख्य परीक्षेचे अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी उपलब्ध करुन देण्यात येतील.

४. आयोगाच्या कार्यनियमावलीनुसार कोणत्याही भरतीप्रक्रियेतील पूर्व परीक्षेच्या गुणांची फेरपडताळणी करण्याची तरतूद नाही. त्यामुळे उमेदवारांनी फेरपडताळणीकरीता केलेली अभिवेदने विचारात न घेता परस्पर दफ्तरदाखल करण्यात येतात व यासंदर्भात उमेदवारांना काहीही कळविले जात नाही. सदर प्रक्रियेसंदर्भात आयोगाच्या संकेतस्थळावरील ‘उमेदवारांना सर्वसाधारण सूचना’द्वारे यापूर्वीच उमेदवारांना माहिती देण्यात आली आहे.

५. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, प्रसिध्दीमाध्यमांमधून निकालासंदर्भात जाणीवपूर्वक संभ्रम निर्माण करुन आयोगावर दबाव आणण्याचा प्रयत्न करत असलेल्या उमेदवारांच्या गैरवर्तनाची आयोगाकडून गंभीर दखल घेण्यात आली आहे.

ठिकाण:- मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग